महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
- इलेक्ट्रिकल सुपरवायझर
- इलेक्ट्रिकल वायरमन
- टू-व्हीलर मेकॅनिक
- A.C. मेकॅनिक
- कॉम्प्युटर ऑपरेटर
- ऑटोमोबाईल टेक्निशियन
- मोटार वायडिंग
- फोर व्हीलर मेकॅनिक
- वेल्डर / फ्लंबर
- कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १५ वा | बुधवार, दि. ३० जुलै २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

विकणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५
८२७५२७४२५३
पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

# आता सरकारला संधी नाही, सरळ मुंबईला निघायचं





## मराठ्यांच्या नादाला लागू नका म्हणत जरांगेंचा आंदोलनाचा इशारा

**जालना (कटूसत्य वृत्त):-** गेल्या दोन वर्षापासून मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी आता पुन्हा आंदोलनाचे हत्यार उपसले आहे.

त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी मराठा आंदोलकांसह ते मुंबईत जाणार असल्याचं सांगितलं. तसेच यावेळी त्यांनी तुम्ही एकदा आमच्यावर हल्ला केला पण आता ती चूक करू नका असा इशारा यावेळी जरांगे यांनी सरकारला दिला आहे.

**काय म्हणाले मनोज जरांगे?**

मराठा आंदोलकांनी कुणी कुणाची वाट पाहू नका. आता कोणतीही बैठक होणार नाही. तालुक्यात आणि जिल्ह्यात कोणीही वाट बघायची नाही. आता सगळ्यांनी सरळ मुंबईला निघायचं आहे. माझं शरीरही साथ देत नाही आहे. आरक्षणासाठी 2 वर्ष संधी दिली. त्यामुळे सरकारला आता संधी देणार नाही. ते कितीही वेळ अभ्यास करतील. त्यांनाच अभ्यास करायचा होता तर समिती कशाला नेमली? आम्हाला, समितीला, आयोगाला, घटनातज्ज्ञांना अभ्यास करायचा आहे. असं म्हणत सरकार नाटकं करत आहे.

तुम्ही अला 15 वर्ष अभ्यास करत बसाल अन आम्ही उस तोडत बसतो. आम्हाला शेती विकायची वेळ आली आहे. आमच्या मागणीवर अंमलबाजवणी करा. अन्यथा आम्ही वेगळा मार्ग अवलंबू. मराठ्यांच्या नादाला लागू नका. पांदन रस्ताही शिल्लक ठेवणार नाही. फडणवीस आणि सरकारला सांगतो. आमच्या मुंबईत येणाऱ्या एकाही मराठा आंदोलकांना काठीही लागला कामा नये. आम्ही शांततेत लोकशाही मार्गाने आंदोलन करणार आहोत. मी माझ्या समाजाला वाईट मार्गाला लागू देत नाही. तुम्ही एकदा आमच्यावर हल्ला केला पण आता ती चूक करू नका असा इशारा यावेळी जरांगे यांनी सरकारला दिला आहे.

## 'ऑपरेशन सिंदूर हा केवळ सरकारचा तमाशा होता', प्रणिती शिंदेंचं वक्तव्य

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेला हल्ला आणि त्यानंतर भारतीय सैन्यदलाने राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' या मोहिमेबाबत लोकसभेमध्ये प्रदीर्घ चर्चा चालू आहे.




या चर्चेदरम्यान, विरोधकांनी अनेक प्रश्न उपस्थित करून सरकारला धारेवर धरलं. दरम्यान, काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांनी केलेल्या एका वक्तव्यामुळे त्यांच्यावर टीका होऊ आहे. प्रणिती शिंदे सभागृहात म्हणाल्या की 'ऑपरेशन सिंदूर हे नाव जरी देशभक्तीचं वाटत असलं तरी हा केवळ सरकारचा प्रसारमाध्यमांवरील तमाशा होता. या मोहिमेतून सरकारने काय सिद्ध केलं ते अद्याप कोणालाही समजलेलं नाही.'

खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या, 'ऑपरेशन सिंदूर हे नाव ऐकताना असं वाटतं की यात देशभक्ती आहे. मात्र, हा प्रसारमाध्यमांवर दाखवला गेलेला सरकारचा एक तमाशा होता. कारण या मोहिमेद्वारे आपण काय साध्य केलं, किती दहशतवाद्यांना पकडलं, शत्रूने आपली किती विमानं पाडली या हल्ल्याला कोण जबाबदारी होतं, यात कोणाची चूक होती, दहशतवादी कुठून आले, आपल्या नागरिकांना ठार मारून दहशतवादी कुठे पळून गेले, यापैकी सरकारला काहीच माहिती नाही. सरकारकडे कुठल्याही प्रश्नाचं उत्तर नाही.'

**पंतप्रधान २४/७ निवडणुकांच्या विचारात असतात**

काँग्रेसच्या खासदार म्हणाल्या, 'सरकारकडे ऑपरेशन सिंदूरबाबत कुठल्याही प्रश्नाचं उत्तर नाही आणि यांना शेजारी असलेल्या देशावर आक्रमण करायचंय, त्या नावाखाली निवडणुकीत लोकांची मतं घ्यायची आहेत. कोणी मेलं तरी यांना काहीच फरक पडत नही. कारण आपले पंतप्रधान आणि सरकार २४/७ (दिवसाचे २४ तास, आठवड्याचे सातही दिवस) निवडणुकांच्या मोडमध्ये असतात. आपल्या देशाची प्रतिमा याआधी इतकी कमकुवत कधीच झाली नव्हती. मात्र, या लोकांमुळे तसं घडलंय. कारण यांना प्रत्येक गोष्टीचा इव्हेंट करायचा आहे. माझी मोदींना विनंती आहे की प्रत्येक गोष्टीचा इव्हेंट करणं थांबवा. माझी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विनंती आहे की त्यांनी त्यांची 'मन की बात' थांबवून 'जन की बात' करावी, जनतेच्या प्रश्नांची उत्तरं देण्याची हिंमत दाखववी.'

निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा ॲण्ड फिजिओथेरपी सेंटर
निरामय पॅरालिसिस सेंटर
प्रत्येक जिल्ह्यात फ्रेंचाइजी देणे आहे
फ्रेंचाइजी का घ्यावी?
- No Royalty.
- कमीत कमी Operating Cost.
- तुलनेने सर्वाधीक नफा मिळेल.
- अनुभवी डॉक्टर
- अनुभवी स्टाफ
- कमीत कमी गुंतवणुक
फ्रेंचाइजी साठी आजच संपर्क करा
9503310568

## भूमिअभिलेखचा लिपिक लाचलुचपतच्या जाळ्यात

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** विहीर, बोअरवेल नोंदीसाठी लाच मागणारा भूमिअभिलेखचा लिपिक शंकर अरुण बजबळकर (वय ३०, रा. तिप्पेहळ्ळी, ता. सांगोला) आणि रिक्षा चालक सूरज रवींद्र सर्वगोड (रा. हौसेवस्ती, मरिआई चौक, देगाव रोड, सोलापूर) यांच्याविरूद्ध सदर बझार पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

तक्रारदार यांची वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथे सात हेक्टर ५२ गुंठे वडिलोपार्जित शेतजमीन आहे. तक्रारदार व त्यांच्या भावांच्या क्षेत्राची रीतसर मोजणी झाल्यानंतर पोटहिस्सा पाडून नकाशे मिळाले होते. त्यानंतर तक्रारदाराच्या पोटहिश्यातील विहीर व बोरवेलची नोंद लावण्यासाठी आकारफोड बाबत दक्षिण सोलापूरच्या उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयास अर्ज केला होता. ते काम करून साहेबांची स्वाक्षरी घेऊन तहसिल कार्यालयास पाठविण्यासाठी संशयित आरोपीने दहा हजार रुपयांची लाच मागितली.

त्यानंतर तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय गाठले. तक्रारीच्या अनुषंगाने सोमवारी (ता. २८) पडताळणी दरम्यान शंकर बजबळकर याने तडजोडअंती नऊ हजाराची लाच घेण्याचे मान्य करून रक्कम रिक्षा चालक सर्वगोड यास द्यायला सांगितले. तो खासगी इसम होटगी रोडवरील किनारा हॉटेल परिसरात लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडला.

संशयित आरोपीच्या घर झडतीसाठी पथक तत्काळ रवाना करण्यात आले असून त्यावेळी घरात काही सापडले नाही. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस उपअधीक्षक प्रशांत चौगुले व पोलिस निरीक्षक गणेश पिंगुवाले यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस फौजदार एस. व्ही. कोळी, अंमलदार संतोष नरोटे, गजानन किणगी, राजू पवार, सचिन राठोड व चालक राहुल गायकवाड, अक्षय श्रीराम यांच्या पथकाने पार पाडली.

## पंढरपुरातील सर्व घाट बंद तालुक्यातील आठ बंधारे पाण्याखाली



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** उजनी धरणातून भीमा नदीत ७१ हजार ६०० क्युसेक इतका विसर्ग सुरू करण्यात आला. तर, वीर धरणातून नीरा नदीमध्ये सकाळी दहापासून ३२ हजार ६६३ इतका विसर्ग सुरू आहे.

नीरेचे पाणी माळशिरस तालुक्यातील संगम येथून पुढे भीमा नदीत येते. त्यामुळे भीमेकाठी पूरस्थिती निर्माण झाली आहे. तर, पंढरपुरात चंद्रभागेने सायंकाळी इशारा पातळी ओलांडली. नदीकाठच्या नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत.

पंढरपुरात ४५ हजार क्युसेक इतक्या विसर्गाने चंद्रभागा प्रवाहित आहे. खबरदारी म्हणून चंद्रभागाचे सर्व घाट बंद करण्यात आले आहेत. मागील काही दिवसांपासून पुणे परिसरात जोरदार पाऊस सुरू आहे. उजनी धरणात येणाऱ्या पाण्याची आवक वाढली आहे. उजनी धरण जवळपास ९७ टक्के भरले आहे. सध्या धरणात ११५ टीएमसी इतका पाणीसाठा आहे. उजनी धरणात सुमारे ४४ हजार क्युसेकने आवक सुरू आहे. ऐनवेळी मोठा पाऊस झाल्यास पूरस्थिती निर्माण होऊ नये यासाठी उजनी धरण व्यवस्थापनाने भीमानदीतून पाण्याचा विसर्ग वाढवून तो ७१ हजार ६६३ क्युसेक इतका केला आहे. तर, नीरेतूनही मोठ्या प्रमाणावर पाणी भीमेत येत आहे. त्यामुळे सध्या भीमानदी एक लाख १० हजाराहून अधिक क्युसेकने वाहू लागली आहे. दरम्यान, पंढरपुरात सायंकाळी चंद्रभागेने (४४३ मीटर) इशारा पातळी ओलांडली आहे. विसर्गामध्ये आणखी वाढ झाल्यास चंद्रभागा धोकापातळी गाठण्याची शक्यता आहे.



सामाजिक न्याय हक्कासाठी
भव्य रक्तदान शिबीर
लोकनेते बाबुराव (आण्णा) पाटील
यांच्या जयंती निमित्त भव्य रक्तदान शिबिर
लोकनेते बाबूराव आण्णा पाटील व कै. हरीदास सुरवसे यांच्या जयंती निमित्त शुक्रवार दि. १ ऑगस्ट २०२५ रोजी श्रीहरी सार्वजनिक वाचनालय वडाचीवाडी ता. मोहोळ जि. सोलापूर येथे रक्तदान शिबिर आयोजित केलेले आहे.
आयोजक व सपंर्क
नेताजी राजाराम सुरवसे -मो.८३२९४९४६४६,
रामेश्वर सुरवसे -मो.९५६१०१०३३७, सुहास म्हमाणे -मो.७५५९१०३१००

## सोलापुरात 'लम्पी'चा संसर्ग वाढला; संपूर्ण जिल्हा नियंत्रित क्षेत्र घोषित

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात एक हजार ३० पशुधन लम्पी बाधित होते. त्यापैकी १७ पशुधनांचा मृत्यू झाला असून, ७२१ पशुधन बरे झाले आहेत. सध्या २९२ पशुधन लम्पी बाधित आहेत. त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. तुलनेने ही संख्या कमी असली, तरी खबरदारी म्हणून संपूर्ण सोलापूर जिल्हा नियंत्रित क्षेत्र घोषित करण्यात आला आहे. प्रभारी जिल्हाधिकारी कुलदीप जंगम यांनी यासंबंधीचा आदेश काढला आहे. जिल्ह्यात उपचारानंतर पशुधन बरे झाले असले, तरी नऊ तालुक्यांत रोगाचे संसर्ग केंद्र आढळले आहेत. तर पशुसंवर्धन आयुक्तालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार पशुधन बाधित केंद्राच्या पाच किलोमीटर परिसरात लसीकरणाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार जिल्हा पशुसंवर्धन विभागाने जिल्हाधिकारी यांच्याकडे नियंत्रित क्षेत्र घोषित करण्याबाबत प्रस्ताव पाठवला होता.

त्यानुसार हा निर्णय प्रभारी जिल्हाधिकारी जंगम यांनी घेतला आहे. या निर्णयानुसार लम्पी बाधित परिसरातील गोवर्गीय पशुधनास गोट पॉक्स लसीकरण केले जाते. विशेषतः गोवर्गीय पशुधनाची ने-आण करताना २८ दिवसांपूर्वी गोट पॉक्स लसीकरण बंधनकारक असणार आहे. त्यासाठी गोट पॉक्स लसीकरण प्रमाणपत्र सोबत बाळगणे बंधनकारक करण्यात आले आहे. बाधित पशुधनाच्या संपर्कातील वैरण, गवत, साहित्य, कातडी आदी नियंत्रित क्षेत्रातून बाहेर नेण्यास मनाई करण्यात आली आहे. गोजातीय पशुधनाचे बाजार भरवताना लसीकरण प्रमाणपत्र, पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचा दाखल बंधनकारक करण्यात आला आहे. गोवर्गीय पशुधनाच्या शर्यती, जत्रा, प्रदर्शन भरवतानाही लसीकरण, पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचा दाखला बंधनकारक करण्यात आला आहे.



संपादकीय

# नेमकी उत्तरे हवीत

संसदीय कामकाजाचा पहिला आठवडा वाया गेल्यानंतर आज अखेर लोकसभेमध्ये 'ऑपरेशन सिंदूर'वर चर्चा सुरू झाली. सरकारच्या वतीने संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी चर्चेला सुरुवात केली. त्यांच्या प्रदीर्घ भाषणात समाधानकारक असे काहीही नव्हते. हा मोदींच्या नेतृत्वाखालील नवीन भारत आहे, पाकिस्तानातील दहशतवाद्यांना घरात घुसून मारू, आम्हाला युद्ध नको आहे; पण खुमखुमी दाखवाल तर कायमचा धडा शिकवू वगैरे ठेवणीतली वाक्ये ऐकवून राजनाथ सिंह यांनी भाषण पूर्ण केले. पण त्यांच्या या प्रदीर्घ भाषणात 'ऑपरेशन सिंदूर'च्या अनुषंगाने जे जे प्रश्न उपस्थित झाले आहेत त्यापैकी एकाचेही उत्तर नव्हते किंवा त्यातील एकाही मुद्द्याला त्यांनी स्पर्श करायचा प्रयत्न केला नाही.

भारताने पाकिस्तानला चोख धडा शिकवला, त्यामुळे पाकिस्तान गुडघ्यावर आले आणि त्यांनी भारताकडे युद्धबंदीची अपेक्षा केली त्यानुसार युद्धबंदी झाली, असे ते म्हणाले. मुख्य प्रश्न असा होता की, जर पाकिस्तान आपल्यापुढे गुडघे टेकत होता तर त्यावेळी आपण त्यांच्यापुढे नेमक्या कोणत्या अटी घातल्या हे सरकारने स्पष्ट करावे, अशी मागणी अनेक दिवस होत होती; पण सरकारने त्यावर काहीही उत्तर दिलेले नाही.

पाकिस्तानला बिनशर्थ माफी द्यायचे कारण काय होते यावर सरकार काही बोलले नाही. ट्रम्प यांनी मध्यस्थी कशी केली या प्रश्नालाही बगल दिली गेली. दोन्ही देशांमध्ये मीच युद्धबंदी केली असे ट्रम्प 26 वेळा का म्हणाले. यावरही राजनाथ सिंह काही बोललेले नाहीत. नुसतेच शाब्दिक फुलोरे उडवत राजनाथ सिंह यांनी आपले भाषण संपवले; पण त्यातून नेमकी वस्तुस्थिती लोकांपुढे किंवा देशापुढे आली नाही. निदान देशाच्या संरक्षण सिद्धतेबाबत अनेक संरक्षणतज्ज्ञांनी चिंता व्यक्त केली असताना त्याबाबत सरकारची काय भूमिका आहे यावर त्यांनी भाष्य करणे अपेक्षित होते, पण तेही झाले नाही. संरक्षण सामग्री मिळण्याची प्रक्रिया खूप जटील आहे आणि त्यात खूप वेळ जातो अशाही तक्रारी आहेत. लष्करातील विद्यमान कार्यरत अधिकाऱ्यांनीही त्याबाबत जाहीर नाराजी व्यक्त केली असूनसुद्धा संरक्षण मंत्र्यांना त्यावर काहीही बोलावेसे वाटले नाही याचे आश्चर्य वाटल्याखेरीज राहात नाही. विरोधी पक्षाकडून काँग्रेसचे आसाममधील खासदार गोगोई यांनी चर्चेला प्रारंभ केला. त्यांनी केलेले भाषण मात्र अत्यंत टोकदार होते. संरक्षण मंत्र्यांच्या निवेदनात आम्हाला आणि देशाला काय अपेक्षित आहे किंवा काय अपेक्षित होते यावर त्यांनी नेमकेपणाने बोट ठेवत सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानच्या विरोधात युद्ध सुरू झाल्यानंतर जगातला एकही देश भारताच्या बाजूने का आला नाही, असा सवाल करत गोगोई यांनी सरकारची कोंडी करण्याचा प्रयत्न केला.

ऐन युद्धकाळात पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, आशियाई विकास बँक आणि जागतिक बँक या महत्त्वाच्या वित्तीय संस्थांनी भरभरून आर्थिक मदत केली. पाकिस्तानला केली जाणारी मदत अंतिमतः भारताच्या विरोधात वापरली जाईल अशी भारताची भूमिका होती, पण त्याकडे एकाही संस्थेने किंवा देशाने लक्ष दिले नाही ही वस्तुस्थिती गोगोई यांनी नेमकेपणाने मांडली. पहलगाम हत्याकांडाचा जगातल्या अनेक देशांनी निषेध केला, पण या हत्याकांडाला जबाबदार असलेल्या पाकिस्तानचा एकही देशाने निषेध केलेला नाही ही वस्तुस्थितीही त्यांनी कथन केली. भारताची पाच लढाऊ विमाने पाकिस्तानने पाडली असा दावा वारंवार केला गेला आहे, पण त्याबाबत सरकारने कायमच लपवाछपवी केली आहे.

या संबंधातील वस्तुस्थिती देशापुढे मांडायला सरकार का कचरते असाही काँग्रेस नेत्यांचा प्रश्न होता. आज दिवसभरात या विषयाच्या अनुषंगाने जी चर्चा झाली त्यात सत्ताधारी पक्षाकडून झालेली भाषणे निराशाजनकच होती. विरोधी पक्षाचे लोक पाकिस्तानची भाषा बोलतात असा त्यांचा मुख्य आरोप याही वेळी कायम राहिला. सैन्याच्या पराक्रमावर विरोधी पक्षाचे लोक प्रश्नचिन्ह उपस्थित करतात वगैरे जुने आक्षेप सत्ताधारी पक्षाचे लोक पुढे करत राहिले, पण त्यात वस्तुस्थिती मांडण्यापेक्षा फुकाचा अविर्भावच अधिक होता. वास्तविक पाकिस्तान विरोधातील संघर्षात देशातल्या तमाम विरोधी पक्षांनी सरकारची पाठराखण करीत सरकार या संबंधात जी भूमिका घेईल त्याला पूर्ण समर्थन जाहीर केले असताना विरोधी पक्षाचे लोक पाकिस्तानची बाजू घेऊन बोलतात या आरोपात कुठलेही तथ्य नाही.

भारत जिंकण्याच्या स्थितीत असताना किंवा या संघर्षात भारतीय सैन्याने पाकिस्तानवर वर्चस्व मिळवले असताना अचानक युद्धबंदी का स्वीकारली गेली, हा लाखमोलाचा प्रश्न या चचेर्तून अनुत्तरित राहता कामा नये. या चचेर्ला उत्तर देताना सरकारकडून या सगळ्या बाबींवर भाष्य होणे अपेक्षित आहे, ते होईल की नाही यावरच या सोळा तासांच्या चचेर्चे यश अवलंबून असेल. मुळात पाकिस्तानविषयीच्या संघर्षाच्या मुद्द्यावर सगळा देश एकत्र आहे अशी खात्री सरकारला वारंवार दिल्यानंतरही या संघषार्बाबतची नेमकी वस्तुस्थिती देशापुढे मांडायला सरकारने कचरायचे कारण नाही.

दोन देशांमध्ये जेव्हा युद्ध होते त्यावेळी काही ना काही नुकसान अपेक्षितच असते, ते मान्य करून त्यातून चुका सुधारायच्या असतात. पण जर तुम्ही चुकाच मान्य केल्या नाहीत, तर परिस्थिती सुधारण्यालाही संधी मिळत नाही, ही बाब सरकारने ध्यानात घ्यायला हवी आहे. हा केवळ भाजप सरकारच्या एकट्याचा यशाचा किंवा अपयशाचा विषय नाही संपूर्ण देशापुढील संरक्षणविषयक आव्हानाचा हा विषय आहे. त्यामुळे निदान संरक्षण मंत्र्यांनी तरी आज अधिक प्रगल्भ निवेदन करायला हवे होते. लोकसभेतील ही चर्चा उद्याही सुरू राहणार आहे, त्या चर्चेअंती तरी काही हाती लागेल का नाही याचीच आता उत्सुकता आहे.

# पुरस्कारांचे बदलते स्वरूप...

काल मला ड्रीम फाउंडेशनच्या वतीने, भारताचे माजी राष्ट्रपती आणि 'मिसाईल मॅन' भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम सर यांच्या दहाव्या पुण्यतिथीनिमित्त "डॉ. कलाम राष्ट्रभारणी प्रेरणा पुरस्कार" देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. कलाम यांच्यासोबत संशोधन कार्यात सहभागी असलेले वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. अशोक नगरकर आणि दुसरे वैज्ञानिक डॉ. व्यंकटेश गंभीर यांच्या हस्ते हा पुरस्कार मला प्रदान करण्यात आला. ड्रीम फाउंडेशनचे संस्थापक श्री. काशीनाथ भतगुणकी यांनी या कार्यक्रमाचे नेटके आयोजन केले होते.

पुरस्कार देणारे कोण आहेत? त्यांचा उद्देश काय आहे? हे पाहून पुरस्कार स्वीकारण्याचा निर्णय घेतला पाहिजे. इव्हेंटबाजी म्हणून अनेक वेळा पुरस्कार समारंभ आयोजित केले जातात. आपल्या नावाचा आणि खोट्या कामाचा गवगवा करण्यासाठी अनेक अवैध व्यावसायिकांनी सामाजिक संस्था तयार केल्या आहेत. ते देखील पुरस्कार वितरण सोहळ्यांचे आयोजन करतात. काही ठिकाणी तर पुरस्कारांची विक्री केली जाते. ज्यांना पुरस्कार हवा असतो, त्यांच्याकडून देणगी रूपात हजारो, लाखो रुपये घेतले जातात.काही पुरस्कार हे प्रतिष्ठेचे समजले जातात. ते मिळवणे किंवा जाहीर होणे म्हणजेच समाजाकडून त्या व्यक्तीच्या कार्याचे मूल्यमापन होऊन, सर्वोत्कृष्टतेची पोचपावती मिळणे, असे समजले जाते. निरपेक्ष भावनेने दिले गेलेले पुरस्कार व्यक्तीला त्याच्या कायार्साठी प्रेरणा देतात. अन्न, वस्त्र, निवारा या भौतिक गरजांच्या पुढे जाऊन माणसाच्या काही भावनिक गरजा असतात. यामध्ये प्रेम, प्रतिष्ठा, सहकार्य, प्रोत्साहन, आपलेपणा यांचा समावेश होतो. समाजासाठी काम करणाऱ्या लोकांना अनेक वेळा अपयशाला सामोरे जावे लागते. अनेक जण काम करणाऱ्याचे पाय ओढतात. आंब्याच्या झाडाला दगडं मारली जातात, पण बाभळीच्या झाडाच्या नादाला कोणी लागत नाही. त्याप्रमाणे कार्यरत व्यक्तींना सतत टीकेचे धनी व्हावे लागते. यामुळे त्या कार्यतत्पर व्यक्ती हिरमुसल्या जातात. आपल्या कामापासून परावृत्त होऊ शकतात. त्याच काळात जर समाजाकडून त्यांना पुरस्कार दिला गेला, तर त्या व्यक्ती पुन्हा जोमाने कामाला लागतात.

पुरस्कार देणे ही संकल्पना गोड, प्रेरणादायी आणि व्यक्तिमत्त्व उंचावणारी आहे. जगभरातील पुरस्कारांचा विचार केला तर नोबेल पुरस्कार हा सर्वोत्कृष्ट पुरस्कार मानला जातो. स्वीडिश शास्त्रज्ञ आणि अभियंता अल्फ्रेड नोबेल यांनी आपली संपत्ती (२६५ दशलक्ष स्वीडिश क्रोनर) वैज्ञानिक संशोधन, साहित्य आणि शांतता या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देण्यासाठी दान केली. सामाजिक आणि शांततेशी संबंधित घडामोडींमध्ये नोबेल यांना रस होता आणि त्यांच्या त्या काळातील विचार प्रागतिक होते.नोबेल यांनी त्यांच्या मृत्युपत्रात लिहिले आहे "prizes to those who, during the preceding year, have conferred the greatest benefit to humankind" - म्हणजेच, आधीच्या वर्षभरात मानवजातीसाठी महत्त्वाचं ठरणारं काम करणाऱ्यांना हे पुरस्कार देण्यात यावेत. आजपर्यंत रविंद्रनाथ टागोर, सी. व्ही. रमण, हरगोविंद खुराणा, मदर टेरेसा, सुब्रमण्यम चंद्रशेखर, अमर्त्य सेन, कैलाश सत्यार्थी, अभिजीत बॅनर्जी या भारतीयांना नोबेल पारितोषिक मिळाले आहे.

रॅमन मॅगसेसे पुरस्कार (Ramon Magsaysay Award)हा आशिया खंडातील एक महत्त्वाचा पुरस्कार आहे. याला "आशियातील नोबेल पुरस्कार" म्हणूनही ओळखले जाते. हा पुरस्कार फिलिपिन्सचे माजी राष्ट्राध्यक्ष रॅमन मॅगसेसे यांच्या स्मरणार्थ दिला जातो. सरकारी सेवा, समाजसेवा, पत्रकारिता, साहित्य, कला आणि आंतरराष्ट्रीय संबंध यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो. आजपर्यंत विनोबा भावे, चिंतामण देशमुख, वर्गीस कुरियन, जयप्रकाश नारायण, कमलादेवी चट्टोपाध्याय, सत्यजित रे, पं. रविशंकर, महाश्वेता देवी, मंदाकिनी आमटे, डॉ. प्रकाश आमटे या भारतीयांना मॅगसेसे पुरस्कार मिळाले आहेत.

भारतातील सर्वोत्कृष्ट पुरस्कार भारतरत्न आहे. हा पुरस्कार भारत सरकारद्वारे दिला जातो. मानवी प्रयत्नांच्या कोणत्याही क्षेत्रात सर्वोच्च दर्जाच्या कायार्साठी हा पुरस्कार दिला जातो. भारतरत्न हा भारतातील सर्वोच्च नागरी पुरस्कार आहे.

पद्म पुरस्कार — पद्मविभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री — हे भारतरत्न पुरस्कारानंतर दिले जातात. परमवीर चक्र, महावीर चक्र आणि वीर चक्र हे पुरस्कार युद्धकाळात विशेष शौर्य दाखवणाऱ्या व्यक्तींना दिले जातात. विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, अर्जुन पुरस्कार, साहित्य अकादमी पुरस्कार इत्यादी दिले जातात. भारतातील सर्वोच्च क्रीडा पुरस्कार म्हणजे मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार (पूवीर्चा राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार) होय. हा पुरस्कार क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना दिला जातो.

महाराष्ट्र भूषण पुरस्कार हा महाराष्ट्र शासनाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार आहे.महाराष्ट्र राज्य क्रीडा पुरस्कारामध्ये शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (सर्वोत्तम क्रीडा प्रशिक्षक) आणि जिजामाता पुरस्कार (महिला क्रीडा प्रशिक्षक) यांचा समावेश आहे.

महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार हा चित्रपटसृष्टीतील उत्कृष्ट कायार्साठी दिला जातो.

उद्योगरत्न पुरस्कार महाराष्ट्रातील उद्योगांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना दिला जातो.

अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार हा संगीत रंगभूमी क्षेत्रातील योगदानासाठी दिला जातो.

गदिमा पुरस्कार साहित्य, कला आणि संस्कृती क्षेत्रातील योगदानासाठी दिला जातो.

याचबरोबर प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात आणि गावपातळीवर अनेक पुरस्कार दिले जातात.

पुरस्कार देणे या संकल्पनेत मानवी अपप्रवृत्ती घुसल्यामुळे, पुरस्कार देणे-घेणे यावरून अनेक वेळा संघषार्चे प्रसंग निर्माण होतात. काही पुरस्कार वादग्रस्त ठरतात. एखाद्याला पुरस्कार देणे काही लोकांना मान्य नसेल, तर ते लोक आपला विरोध उघडपणे जाहीर करतात.

स्वातंत्र्यपूर्व काळात रवींद्रनाथ टागोर यांनी इंग्रज सरकारने दिलेला 'सर' हा किताब जालियनवाला बाग हत्याकांडानंतर परत केला होता. अर्थात पुरस्कार देणाऱ्याच्या कृत्यांवरती उघड नाराजी व्यक्त करणारे लोक हे त्या पुरस्काराहून मोठे असतात.

पुरस्कार देणे आणि घेणे यामधून सुसंस्कृत समाज निर्माण होत असतो. सदप्रवृत्ती, सद्विचार आणि सद्वर्तन यांना प्रोत्साहन मिळते. पुरस्कारांचे स्वरूप कितीही बदलले, तरी या समारंभातून केवळ फोटोबाजी आणि फुकट प्रसिद्धी न होता, विचारांचे आदानप्रदान आणि चिंतन होणे आवश्यक आहे.



**- किशोर जाधव,** सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

प्रबोधन

# गणित हा पाया । सुखी जीवनाचा

शिक्षणाच्या व्याख्या किमान शंभरभर तरी असतील. त्यातील एक व्याख्या आता नवं रूप धारण करीत आहे. पूर्वी What is Education? असा प्रश्न विचारला की, Three' Rs ' is Education; असं उत्तर दिलं जाई. Reading (वाचन), Writing (लेखन) आणि Arithmetic (गणित) असे ते तीन आर होते. फक्त गणिताच्या सामर्थ्यानें भारतीय संगणक आणि व्यवस्थापनतज्ज्ञ- तंत्रज्ञांनी अमेरिकेवर आपला बौद्धिक झेंडा अभिमानाने फडकावला आहे. जॉर्ज बुश यांनी अमेरिकन मुलांना भारतीय विद्यार्थ्यांचं अनुकरण करण्याविषयी कडक शब्दांत सूचना केली. पण उद्या अमेरिकेच्या महत्त्वाच्या जागा कोरिया, मलेशिया, लाओस, थायलंड, कंबोडिया, जपान, चीनमधील विद्यार्थी ॲबॅकस पद्धतीच्या गणिताच्या अभ्यासाने पटकावणार आहेत. ॲबॅकसचा वापर गणिती बुद्धीला पाचपट अधिक गती मिळवून देतो.

म्हणूनच जीवन गतिमान करायचं असेल, तर गणित आत्मसात केलं पाहिजे, असं अनेक थोर विचारवंत म्हणतात. 'गणित सर्व शास्त्रांचे शास्त्र आहे,' असा गणिताचा उचित गौरव थोर विचारवंत बड रसेल यांनी केला आहे. साने गुरुजींनी हाच विचार वेगळ्या भाषेत सांगताना म्हटलं आहे, 'ज्याचा गणित विषय चांगला तो बुद्धिमान समजला जातो. जगातील सारे तत्त्वज्ञ गणिती होते.' किंबहुना बौद्धिक शिस्त लागण्यासाठी गणित अनिवार्य आहे, असं पाश्चात्त्य विद्वान लाप्लास म्हणतात. 'केवळ हिशोब आणि आकडेमोड करता येणं, हा गणिताचा उद्देश नव्हे. गणिताच्या अभ्यासाने तर्कसंगत विचार करण्याची क्षमता येते आणि बुद्धीला एकप्रकारची शिस्त लागते.' अंतरिक्ष वैज्ञानिक डॉ. नारळीकर हे तर प्रख्यात गणिततज्ज्ञांच्या घराण्यातच जन्मले. आज आघाडीचे विज्ञान कथाकार असलेले नारळीकर म्हणतात, 'गणिताच्या अभ्यासाने बुद्धीला तर्कशुद्ध विचार करण्याची सवय लागते.' तर्क तो अर्क मानावा असं संत रामदास म्हणतात. जी माणसं आज जीवनाच्या आघाडीवर दिसतात, ती सर्व गणितजन्य तर्कशुद्ध विचारानेच यशस्वी झालेली आहेत. द्रष्टेपणा छत्रपती शिवाजी महाराजांमध्येही होता आणि आजच्या एखाद्या स्वबळावर गल्लीपासून दिल्लीपर्यंत वाटचाल करणाऱ्या राजकारणी पुरुषातही तो दिसून येतो. एखाद्या व्यावसायिकाच्या यशस्वितेमध्येही तर्कशुद्ध विचार असतात आणि एखाद्या व्याख्यात्यामध्येही ते असावे लागतात. ही तर्कशुद्धता गणिताच्या अभावी निर्माण होऊच शकत नाही. लोकमान्य टिळक एके ठिकाणी म्हणतात, 'ज्याला गणित विषयाची आवड नाही, त्याची विचारसरणी अपरिपक्व राहाते. गणिताच्या योगाने विचारांची साखळी अत्रुटित आणि सुसंबद्ध होते.'

व्यवहारीपणा आणि अव्यवहारीपणा हे शब्द काही लोक सतत वापरताना दिसतात. नफा-तोटा, काळ- काम-वेग, सरासरी, शेकडेवारी, सरळ आणि चक्रवाढ व्याज यात ज्यांचं थोडंही डोकं चालत नाही, ती माणसं कर्जबाजारी तरी असतात किंवा आत्महत्या तरी करतात.

रँग्लर र. पु. परांजपे, काय जमेला धरावं आणि कशाची वजाबाकी करावी, यात खूपच दर्दी होते, ते त्यांच्या हाडीमांसी व्याप्त असलेल्या गणिती प्रवृत्तीमुळेच. ते म्हणतात, 'धर्मश्रद्धांनी पछाडलेलं मन हे सामान्यतः विवेकशून्य असतं. अशा कमकुवत मनाची माणसं आपल्या भविष्यात काय आहे ते जाणून घेण्यास उतावीळ असतात व ती ज्योतिष्याच्या आहारी जातात... कुंडलीद्वारा भविष्यकथन ही गोष्ट शास्त्र या संज्ञेला पात्र ठरणार नाही. आकाशातील ग्रहगोलांच्या हालचालींचा मानवी जीवनावर परिणाम होतो, याचं लवलेश सत्यही अजून सप्रमाण सिद्ध झालेलं नाही.' गणितप्रेमी माणसं देवधर्म, यज्ञयाग, मंत्रपठन, पूजाअर्चा यात वेळ खर्च करीत नाहीत. कारण आयुष्य फार थोडं मिळालं आहे, हा हिशोब सतत त्यांच्या मनात असतो. म्हणूनच-

हिशोब करूनी । आयुष्य कंठावे
क्षणोक्षणी व्हावे । समृद्ध ते ॥ १
व्यवहार हाच । शिक्षक मानावा
शिक्षणाचा घ्यावा । लाभ त्याच्या ॥२
काळ-काम-वेग। नित्य ज्याच्या मनी
समृद्धीचा धनी । तोच होतो ॥ ३
नफ्याचे गणित । हाच ध्यास ज्याचा
तोटा कधी त्याचा । होत नाही ॥४
आय पाहूनिया । करीतसे व्यय
श्रीमंत अक्षय । तोच होई ॥५
लक्ष्मीच्या व्रताने । श्रीमंती न येते
हिशोबाने होते। लक्ष्मी दासी ॥६
देवाधमार्साठी । पैसा जो खर्चतो
मूर्ख खराच तो । देशद्रोही ॥ ७
माणसाने थोडे। धन रंका द्यावे ।
सुख वाढवावे। दुःखितांचे ॥८
गणित हा पाया। सुखी जीवनाचा
ध्यास गणिताचा । कल्पवृक्ष ॥ ९



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# सोलापूर पोस्ट विभाग आयटी 2.0 कार्यप्रणाली रोलआऊट- एक डिजिटल परिवर्तन उपक्रम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** डाक विभागास आनंद होत आहे की, आमच्या डिजिटल उत्कृष्टतेच्या आणि राष्ट्रनिमार्णाच्या प्रवासातील एक मोठी झेप म्हणून सोलापूर पोस्ट विभाग अंतर्गत आयटी 2.0 ची नवीन कार्यप्रणाली आता कार्यान्वित केली जात आहे. या परिवर्तनात्मक उपक्रमाचा भाग म्हणून, सुधारित प्रणाली सोलापूर विभागातील सर्व टपाल कार्यालयांमध्ये 4 ऑगस्ट 2025 पासून लागू केली जाणार आहे.

या प्रगत डिजिटल प्लॅटफॉर्मकडे सुरळीत व सुरक्षित संक्रमण सुनिश्चित करण्यासाठी 2 ऑगस्ट 2025 रोजी नियोजित वेळापत्रकानुसार कामकाज थांबविण्यात येईल 2 ऑगस्ट 2025 रोजी कोणतेही सार्वजनिक व्यवहार टपाल कार्यालयांमध्ये केली जाणार नाहीत. ही तात्पुरती सेवा स्थगिती डेटा स्थलांतर प्रणाली पडताळणी आणि कॉन्फिगरेशन प्रक्रियेसाठी अत्यावश्यक आहे. जेणकरून नवीन प्रणाली यशस्वीरित्या आणि सुरळितपणे कार्यान्वित होईल. Advance Portal Technology (IT 2.0) रोलआउट वापरकत्यार्साठी सुलभ अनुभव, जलद सेवा आणि अधिक ग्राहकाभिमुख इंटरफेस देण्यासाठी डिझाइन करण्याता आला आहे. ज्यामुळे आमच्या कार्यक्षम, स्मार्ट आणि भविष्यकालीन टपाल सेवांसाठीच्या कटिबध्दतेचे प्रतिबिंब दिसून येते.

# ईच्छा भगवंताची परिवार आयोजित अजित दादा चषक कबड्डी स्पर्धेचे शानदार पारितोषिक वितरण



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ईच्छा भगवंताची बहुउद्देशीय सामाजिक संस्था, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव आणि कार्यसम्राट नगरसेवक नागेश गायकवाड मित्र परिवाराच्या वतीनं सोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या मान्यतेने २१ ते २५ जुलै दरम्यान निवड चाचणी व जिल्हास्तरीय अजिंक्यपद कबड्डी स्पधेर्चे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेमध्ये ७०हून अधिक संघांनी सहभाग नोंदविला तर ९०० पुरुष महिला खेळाडूंचा यामध्ये समावेश होता. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांच्या वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त लिमयेवाडी येथील शंकर भवन येथे या स्पधेर्चे अंतिम सामने पार पडले या अंतिम सामन्याप्रसंगी सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे दमदार आमदार देवेंद्र कोठे, राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष, ज्येष्ठ राष्ट्रवादीचे नेते तथा सिडकोचे माजी अध्यक्ष प्रमोद हिंदुराव, ईच्छा भगवंताची परिवाराचे आधारस्तंभ लक्ष्मण मामा जाधव, राष्ट्रवादी सोलापूर ग्रामीणचे अध्यक्ष उमेश पाटील, सोलापूर शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष संतोष पवार, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, सो मोनिका देवेंद्र कोठे, शहर राष्ट्रवादी कार्याध्यक्ष जुबेर बागवान, शिवसेना जिल्हाध्यक्ष अमोल शिंदे, माजी महिला बालकल्याण समिती सभापती अश्विनी चव्हाण, शिवसेना शहराध्यक्ष सचिन चव्हाण, माजी उपमहापौर पद्माकर काळे, माजी स्थायी समिती सभापती देवेंद्र भंडारे, माजी नगरसेवक तौफिक शेख, गुरुशांत दुत्तरगावकर, गामा पैलवान, सोलापूर महानगरपालिकेचे नगर अभियंता सारिका अकुलवार, हाजी मलंग शेठ,अप्पा रोडगे, माजी नगरसेवक पैगंबर शेख, आनंद मुस्तारे, एडवोकेट सुशील सरवदे, माजी नगरसेविका संगीता जाधव, इरफान शेख, करेप्पा जंगम, नारायण माशाळकर, किरण माशाळकर, सुहास कदम, वैभव गंगणे, अमीर शेख आदी मान्यवरांच्या उपस्थितीत अजिंक्य पद कबड्डी स्पर्धेच्या अंतिम सामन्याचे खेळाडूंचे ओळख होऊन नाणेफेक करून सामन्यास सुरुवात करण्यात आले. या अंतिम सामन्यात जोरदार आक्रमक चढाया अन कौशल्याने होणाऱ्या पकडी चपळाईचा बोनस अशी अटीतटीची लढत करत पुरुष गटात स्वराज्य स्पोर्ट्स क्लब हा विजेता ठरला तर उपविजेता श्रीकृष्ण स्पोर्ट्स क्लबने पटकावला, महिला गटात श्रीराम स्पोर्ट्स क्लब किशोर गट मुलांच्या स्पर्धेत विघ्नहर्ता स्पोर्ट्स क्लब विजेता तर उपविजेता श्रीराम तरुण मंडळ यांनी पटकाविला आणि किशोरी मुलींच्या गटात रुकमाई स्पोर्ट्स क्लब ने विजेतेपद पटकावत उपविजेता युनिक पब्लिक स्कूलने कबड्डीच्या विजेते पदाच्या चषकावर नाव कोरले. सदर स्पधेर्तील विजेता व उपविजेता संघांना अजितदादा चषक हे आमदार कोठे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पाटीर्चे ज्येष्ठ नेते तथा सिडकोचे माजी अध्यक्ष प्रमोदजी हिंदूराव, लक्ष्मण मामा जाधव आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आले. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांच्या वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळ्याप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे यांच्यासह सर्व पक्षीय नेत्यांच्या उपस्थितीत भला मोठा हार केक कापून त्यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी बोलताना किसन जाधव म्हणाले की राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून या कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे कबड्डी स्पर्धेच्या माध्यमातून राज्यस्तरीय आणि आंतरराष्ट्रीय दजार्चे खेळाडू निर्माण व्हावे या मागचा उद्देश आहे आपण आज माझ्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या त्यानिमित्त मी आपले मनस्वी आभार असल्याचे ते म्हणाले. किसन जाधव हे पक्ष संघटन बरोबरच जनसेवेसाठी नेहमी तत्पर असतात त्यांचे कार्य कौतुकास्पद आहे किसन जाधव हा सोन्यासारखा माणूस असून अजित दादांचा सच्चा शिलेदार असल्याचे मनोगत यावेळी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते तथा सिडको माजी अध्यक्ष प्रमोदजी हिंदुराव यांनी किसन जाधव यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी बोलताना आमदार देवेंद्र कोठे म्हणाले की किसन जाधव हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ असून त्यांचे राजकीय क्षेत्राबरोबरच सामाजिक क्षेत्रातील कार्य देखील उल्लेखनीय आहे प्रभागातील नागरिकांना मूलभूत सुविधा मिळव्यात यासाठी ते नेहमी पाठपुरावा करीत असतात त्यांचे सहकारी नगरसेवक नागेश गायकवाड यांच्या कार्याचे देखील कौतुक केले. यावेळी संतोष पवार आणि उमेश पाटील यांनी देखील आपल्या मनोगतात किसन जाधव यांच्या कार्याचा गौरव करीत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच महाराष्ट्र राज्याचे अल्पसंख्यांक तथा क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी आमदार दीपक आबा साळुंखे आणि माजी आमदार संजय शिंदे यांनी देखील भ्रमणध्वनीद्वारे किसन जाधव यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. दरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कबड्डी स्पर्धेच नेटक्या संयोजनाने रंगत स्पर्धेचे नेटके संयोजन करण्यात आल्यामुळे प्रेक्षकांना स्पर्धेचा आस्वाद घेता आला. मॅटवर झालेल्या ह्या सर्व सामने पाहण्यासाठी प्रथमच हजारो कबड्डी प्रेमींची उपस्थिती लाभली. ईच्छा भगवंताची परिवाराचे पदाधिकारी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले सदर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष अनिल जाधव, कार्यवाहक मदन गायकवाड, प्रकाश जाधव, एल एस जाधव, निरीक्षक गिरीश जाधव, स्वाती पुंजाल, संतोष जाधव रफिक गारे, श्री चंद्रकांत ब्रदर जाधव, श्री राजू दादा जाधव, श्री बबलू भैय्या यादव कटिंग, समीर विजापुरे, बजरंग गायकवाड, गणेश जाधव, तेजस पैकीकर, मिथुन वडजे, कृष्णा गायकवाड, मेघा गवळी पूजा जाधव गायत्री वायदंडे, रसिका गायकवाड, प्राध्यापिका सुवर्णा कांबळे, प्राध्यापक भक्तराज जाधव, संजय शिंदे, अनिकेत माने, इस्माईल ढवळगी,मरगु जाधव, तन्मय गायकवाड, धनराज जाधव आदींचे या स्पर्धेसाठी विशेष सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता हुले यांनी केले तर आभार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड यांनी मानले.

वात्रटिका

## रेव्ह पार्टी

रेव्ह चे पेव फुटतात
आणि कोणी अडकतो...
संशय बळावतो आणि
वाटते कोणी अडकावतो...
सार्सयाच्या वाट्याचे भोग
जावयाला भोगावे लागते...
तरीही अशा पार्ट्या करणे
फार भूषणावह नसते...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या कार्याध्यक्षपदी डॉ.धवलसिंह मोहिते पाटील यांची बिनविरोध निवड



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेची कार्यकारिणी निवड नुकतीच जाहीर झाली असून या परिषदेच्या कार्याध्यक्षपदी डॉ.धवलसिंह मोहिते पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेची निवडणुक पुणे येथे पार पडली.यामध्ये महाराष्ट्रातील 33 जिल्हा संघटनांनी सहभाग घेतला होता.या निवडणुकीत कुस्तीगीर परिषदेच्या अध्यक्षपदी आ.रोहित पवार यांची निवड करण्यात आली असून कार्याध्यक्षपदी डॉ.धवलसिंह मोहिते पाटील यांची निवड करण्यात आली.यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उच्च न्यायालयाचे माझी न्यायमूर्ती अनंत बदर यांनी काम पाहिले

स्वर्गीय मामासाहेब मोहोळ यांनी महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेची मुहूर्तमेढ रोवलेली होती.त्यानंतर या परिषदेचे दिर्घकाल नेतृत्व शरद पवार यांनी केले होते. शरद पवार यांच्या कार्यकाळात कुस्तीगीर परिषदेच्या उपाध्यक्षपदाची जबाबदारी डॉ.धवलसिंह मोहिते पाटील यांनी यशस्वीपणे पार पाडली होती.

ग्रामीण भागात कुस्तीच्या खेळाला चालना देण्याचे काम व मल्लांना प्रोत्साहन देण्याचे काम डॉ. धवलसिंह मोहिते पाटील यांच्याकडून होत असून काही वर्षापुर्वी महाराष्ट्र जनसेवा संघटनेच्या माध्यमातून प्रतापसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनखाली डॉ.धवलसिंह मोहिते पाटील यांनी महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे अकलूज येथे आयोजित करण्यात आली होते तसेच स्वर्गीय प्रतापसिंह मोहिते पाटील यांच्या स्मरणार्थ महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेतील उपमहाराष्ट्र केसरी विजेत्याला मल्ला चांदीची गदा देऊन सन्मान करण्यात येतो.डॉ.धवलसिंह मोहिते पाटील यांची कार्याध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्यानंतर त्यांच्यावर महाराष्ट्रातून तसेच सोलापूर जिल्ह्यातील त्यांच्या चहात्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत असून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# गोदुताई गृहनिर्माण संस्थेचा महावितरण विभागाला इशारा; निष्क्रिय कारभाराविरोधात तीव्र संताप

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** कॉ.गोदुताई परुळेकर महिला विडी कामगार गृहनिर्माण संस्था 'क' विभागातील महावितरण कार्यालयाच्या निष्क्रिय कारभाराविरोधात संस्थेचे पदाधिकारी आक्रमक झाले आहेत. कुंभारी विडी घरकुल वसाहतीतील नागरिकांना गेल्या चार ते पाच महिन्यांपासून वीजबिल वितरण करण्यात आलेले नाही. याशिवाय, वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, कोणतीही पूर्वसूचना न देता वीज कनेक्शन अचानकपणे तोडणे अशा गंभीर समस्यांचा नागरिकांना सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर संस्थेचे मुख्य प्रवर्तक तथा माजी आमदार कॉ नरसय्या आडम मास्तर यांच्या मार्गदर्शनाखाली



कॉ.गोदुताई परुळेकर महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष कॉ.फातिमा बेग यांच्या नेतृत्वाखाली संस्थेचे संचालक मंडळ व पदाधिकाऱ्यांनी शिष्टमंडळामार्फत महावितरण कार्यालयाचे सहाय्यक अभियंता श्री. सुनील पवार यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर केले. या निवेदनात समस्यांचे तातडीने निराकरण करण्याची मागणी करण्यात आली.

या वेळी सहाय्यक अभियंता श्री. पवार यांनी पुढील चार ते आठ दिवसांत वीजबिल वितरण सुरळीतपणे सुरू करण्याचे आणि वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडित होण्याच्या समस्येवर आवश्यक देखभाल करून तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.

तरीही, या आश्वासनांची अंमलबजावणी पंधरा दिवसांत झाली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

यावेळी सचिव आरिफा शेख, प्रभारी कॉ.बापू साबळे, कॉ वसीम देशमुख, कॉ.अफसाना बेग, संचालक तय्यबा देशमुख, सुवर्ण लकापत्ती, मुतुर्जा शिपाई, राधा बंडू, खैरुनिसा खरादी, फर्जना चौधरी, यास्मिन खलिफा, रईसा शेख ,एजाज खलिफा महीबूब मनियार, इमाम शेख, विलास कंदकुरे, श्रीनिवास गोण्याल, मोहसीन शेख, गोविंद सज्जन, बलराज स्वाके, तोफिक तांबोळी व इतर कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# चंद्रभागेने इशारा पातळी ओलांडली; पंढरपुरातील सर्व घाट बंद

## तालुक्यातील आठ बंधारे पाण्याखाली

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** उजनी धरणातून सोमवारी (ता. २८) सायंकाळी चार वाजल्यापासून भीमा नदीत ७१ हजार ६०० क्युसेक इतका विसर्ग सुरू करण्यात आला. तर वीर धरणातून नीरा नदीमध्ये सकाळी दहापासून ३२ हजार ६६३ इतका विसर्ग सुरू आहे. नीरेचे पाणी माळशिरस तालुक्यातील संगम येथून पुढे भीमा नदीत येते. त्यामुळे भीमेकाठी पूरस्थिती निर्माण झाली आहे. तर पंढरपुरात चंद्रभागेने सायंकाळी इशारा पातळी ओलांडली. नदीकाठच्या नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत.

सोमवारी सायंकाळी पंढरपुरात ४५ हजार क्युसेक इतक्या विसगार्ने चंद्रभागा प्रवाहित आहे. खबरदारी म्हणून चंद्रभागाचे सर्व घाट बंद करण्यात आले आहेत. मागील काही दिवसांपासून पुणे परिसरात जोरदार पाऊस सुरू आहे. उजनी धरणात येणाऱ्या पाण्याची आवक वाढली आहे. उजनी धरण जवळपास ९७ टक्के भरले आहे. सध्या धरणात ११५ टीएमसी इतका पाणीसाठा आहे. उजनी धरणात सुमारे ४४ हजार क्युसेकने आवक सुरू आहे.

ऐनवेळी मोठा पाऊस झाल्यास पूरस्थिती निर्माण होऊ नये यासाठी उजनी धरण व्यवस्थापनाने भीमानदीतून पाण्याचा विसर्ग वाढवून तो ७१ हजार ६६३ क्युसेक इतका केला आहे. तर नीरेतूनही मोठ्या प्रमाणावर पाणी भीमेत येत आहे. त्यामुळे सध्या भीमानदी एक लाख १० हजाराहून अधिक क्युसेकने वाहू लागली आहे. दरम्यान, पंढरपुरात सायंकाळी चंद्रभागेने (४४३ मीटर) इशारा पातळी ओलांडली आहे. विसर्गामध्ये आणखी वाढ झाल्यास मंगळवारी (ता. २९) दुपारपर्यंत चंद्रभागा धोकापातळी गाठण्याची शक्यता आहे.

पंढरपूर तालुक्यातील करोळे, पटवर्धन कुरोली, कौठाळी, गुरसाळे, पंढरपूर, गोपाळपूर, मुंढेवाडी, पुळूज येथील आठ बंधारे पाण्याखाली गेले आहेत. तर पंढरपूर येथील चंद्रभागेवरील जुना दगडी पूल पाण्याखाली गेला असून पुलावर साधारण २ मीटरपेक्षा अधिक पाणी आहे.



### झोपडपट्ट्यातील नागरिकांचे स्थलांतर

चंद्रभागानदी पात्रातील भक्त पुंडलिक मंदिरासह इतर मंदिरे व साधू-संतांच्या समाधी पाण्याखाली गेल्या आहेत. नदीच्या पैलतीरावरील प्रभूपाद घाट देखील पाण्याखाली गेला आहे. गोपाळपूर येथील विष्णूपद मंदिर ही पाण्यात बुडाले आहे. चंद्रभागेची पाणी पातळी वाढत असल्याने आंबाईपटांग येथील नदीपात्रात अतिक्रमण केलेल्या झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. सध्यातरी पुराचा धोका नसली तरी व्यासनारायण झोपडपट्टी, अंबाबाई पटांगण झोपडपट्टी येथील नागरिकांना सावध राहण्याच्या सूचना दिला आहेत. नागरिकांनी नदीपात्रात जाऊ नये, असे आवाहन तहसीलदार सचिन लंगोटे यांनी केले आहे.

# समुद्रात स्वतःची काळजी घ्या आपली घरी सारेजण वाट पहात आहेत - डॉ.जयपाल पाटील

**अलिबाग (कटूसत्य वृत्त):-** आपण मच्छीमारी साठी खोल समुद्रात नेहमीच जाता तेव्हा बर्फ, पिण्याचे पाणी, जेवणाचे साहित्य, नेहमीची औषधे आठवणीत भरता त्याच प्रमाणे तांडेल वापरीत असलेले सर्वात महत्वाची वायरलेस यंत्रणा, त्याची दोन बॅटरी बरोबर आहेतनां यांची खात्री करून घ्यावी म्हणजे बोटीतील खलाशीवर आपत्ती येणार नाही ज्या अचानक पणे आलेल्या वादळामुळे बोट भरकटत खाली कोकण किनारपट्टीवर, गोवा केरळ गेलात तर नेव्ही आणी पोलीसामुळे घरी याल आणी पाकिस्तान हद्दीत गेलात तर आयुष्य जेलमधे जाईल यासाठीच समुद्रात जातानां मेरी टाईम बोर्डाकडून मिळणाऱ्या सुचनासाठी वायरलेस यंत्रणा बाबीची काळजी घ्यावी.असे मार्गदर्शन ग्रामपंचायत रेवस ने आयोजित आपत्तीव्यवस्थापन कार्यक्रमात रायगड भूषण प्रा.डॉ. जयपाल पाटील केले.यावेळेस व्यासपीठावर प्रशासक प्रितेश पाटील, रायगड भूषण प्रा.डॉ.जयपाल पाटील, माजी सरपंच मच्छिंद्र पाटील, मुख्याध्यापक प्रवीण पाटील,



ग्रामसेवक दिनेश राणे आदि मान्यवर उपस्थित होते.मान्यवरांकडून छत्रपती शिवाजीमहाराज, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले.प्रास्ताविकात प्रितेश पाटील म्हणालेकी आपल्या कडे अनेक प्रकारे आपत्ती येतात त्याला कसे समोरे जायचे याचे ज्ञान प्राप्त असणे आवश्यक असून यासाठीच रायगड जिल्हा परिषद तर्फे ग्रामपंचायतीत या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून याची माहीती आपल्या मित्र परिवार यांस द्यावी. यांनंतर बाळंतपणात 102 व अवघड बाळंतपणात आणी अपघात, साप विंचु दंश वेळेत 108 रुग्णवाहिका,महिलांच्या सुरक्षेबाबत 112 क्रमांक याचा कसा वापर करावा.डॉ.भक्ती पाटील, प्रमुख आरोग्य केंद्र यांनी 20 मिनिटात पेढांबे प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सहाय्यक बवेँ वाहनचालक स्वप्नील पाटील हे 102 रुग्णवाहिका घेऊन आले.ज्येष्ठ व रुग्णास चादरीत व हातावर कसे नेणे याचे प्रात्यक्षिक डॉ.जयपाल पाटील यांनी दिले.महिला सुरक्षे साठी मांडवापोलिस ठाणे पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे यांनी पोलीस हवालदार .प्रदिप देशमुख व महिला पोलीस चंचल सुखेड, येऊन 112क्रमांक ची माहीती दिली.यावेळी 108चे सहाय्यक रायगड जिल्हा प्रमुख अजय जगताप यांनी पेण येथील डॉक्टर अजित हे पायलट सिद्धांत म्हात्रे हे येउन 108 बद्दल माहिती दिली, यावेळी आशा सेविका रुपाली भगत, अंगणवाडी बाई कुमुदिनी कोळी, ग्रामपंचायत कर्मचारी प्रियांका म्हात्रे,मोनिका कडव,मानसी पाटील, तनुजा पाटील नरेश म्हात्रे, यांनी मेहनत घेतली. शेवटी आभार ग्रामसेवक दिनेश राणे यांनी मानले तर सूत्रसंचालन प्राथमिक शिक्षक मनोज राणे यांनी केले.

# नदाफ पतसंस्थेच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा व मान्यवरांचा सन्मान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नदाफ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर (सिद्धेश्वर पेठ) यांच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त सन्मान सोहळा २६ जुलै रोजी सकाळी निर्मलकुमार फडकुले सभागृह, सोलापूर येथे पार पडला. या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थी आणि समाजात विशेष योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नदाफ जमियत महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष आरिफ भाई मन्सुरी उपस्थित होते.

कार्यक्रमाला हाजी के. बी. नदाफ (संस्थापक), सहायक पोलीस आयुक्त सुधीर खीरडकर, वरिष्ठ संपादक हाजी एम. डी. शेख, माजी महापौर आरिफ शेख, राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष तौफिक शेख, माजी नगरसेवक बाबा मिस्त्री, राज्य अल्पसंख्यांक आयोग सदस्य वसीम बुरहान ॲड रियाज शेख, माजी नगरसेवक रियाज हुंडेकरी, आरटीओ विभागातील अबूबकर



नदाफ या प्रमुख मान्यवरांसह पतसंस्थेचे व्हा. चेअरमन युसुफ नदाफ, जॉ. सेक्रेटरी दाऊदभाई नदाफ सह सर्व संचालक उपस्थित होते.

सदर सन्मान समारंभात हाजी एम.डी.शेख, वारीस कुडले, शकील मौलवी, प्रिन्सिपल आसिफ इक्बाल, तौफिक हत्तुरे, मतीन बागवान, सरफराज अहमद, ॲड शकील नदाफ, इफ्तेकार नदाफ, प्रा अकबर नदाफ यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

या वेळी नदाफ समाजातील अनेक गुणवंत विद्यार्थी व विद्यार्थिनींचा सन्मान करण्यात येऊन 12 गरजू व होतकरू विद्यार्थिनीना सायकलचे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप ही करण्यात आले.

कार्यक्रमाची प्रस्तावना पतसंस्थेचे चेअरमन म. सलीम नदाफ यांनी मांडली.सूत्रसंचालन सरदार नदाफ यांनी तर आभार जॉ. सेक्रेटरी डॉ. साकिब नदाफ यांनी मानले. यावेळी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. या सोहळ्याला नागरिकांची मोठी गर्दी केली होती. सदरचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नदाफ पतसंस्थेचे मॅनेजर के एन गुंडेटी व इम्रान शेख सह संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### सभासदांना 10 टक्के लाभांश जाहीर

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पतसंस्थेची 25 वी वार्षिक सर्व साधारण सभा पार पडली. यात सभासदांना 10 टक्के लाभांश जाहीर करण्यात आला व सभेतील सर्व विषयांना एकमताने मंजुरी देण्यात आली.


## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ६०४/२०२५ नि.६

**सोलापूर येथील मा. सिव्हिल जज (वरिष्ठ स्तर), सोलापूर यांचे न्यायालयात**

१) श्री. विवेकानंद तुकाराम कोटा (मयताचा मुलगा)
वय – ६४ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त
रा. २९/आ/४, पद्मा नगर, सोलापूर – ४१३००६
२) श्री. श्रीनिवास तुकाराम कोटा (मयताचा मुलगा)
वय – ६० वर्षे, व्यवसाय – काही नाही
रा. १८२३, न्यू पश्चिम पेठ, सोलापूर – ४१३००५
३) श्री. अंबादास तुकाराम कोटा (मयताचा मुलगा)
वय – ५६ वर्षे, व्यवसाय – नोकरी
रा. १८२३, न्यू पश्चिम पेठ, सोलापूर – ४१३००५
४) श्री. गुरुनाथ तुकाराम कोटा (मयताचा मुलगा)
वय – ५४ वर्षे, व्यवसाय – जमीन दलाल
रा. १८२३, न्यू पश्चिम पेठ, सोलापूर – ४१३००५
५) श्री. रमेश तुकाराम कोटा (मयताचा मुलगा)
वय – ५० वर्षे, व्यवसाय व्यवसाय
रा. १८२३, न्यू पश्चिम पेठ, सोलापूर – ४१३००५ }अर्जदार

**विरुद्ध:**
कोणी नाही }सामनेवाला

या आर्थी यातील अर्जदार क्र. १ ते ५ यांनी कै. भागीरती तुकाराम कोटा यांचे वारसदार म्हणून वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. यातील अर्जदार क्र १ ते ५ हे कै. भागीरती तुकाराम कोटा यांचे मुले असून कै. भागीरती तुकाराम कोटा यांचे दि. ०८/०८/२०२४ रोजी निधन झालेला आहे व तसेच कै. भागीरती तुकाराम कोटा यांचे पती कै. तुकाराम विठोबा कोटा यांचे दि. १४/१०/२००० रोजी निधन झालेला आहे. सदर दोन्ही व्यक्तीच्या मायतानंतर व त्याच्या मृत्यूपश्चात मयताचे वारसदार अर्जदार क्र. १ ते ५ असे आहेत. कै. भागीरती तुकाराम कोटा यांचे मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:

मिळकतीचे वर्णन : डि. व सब. डी. सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ मधील जुना विडी घरकुल, हय हैद्राबाद रोड येतील पुणे ग्रहनिर्माण क्षेत्र विकास मंडळ, पुणे माढा या योजनेतील ग्रहनिर्माण मंडळ वसाहतजुळे सोलापूर भाग दोन या योजनेतील अल्प उत्पन्न गटातील ६५.५० चौ.मी. क्षेत्राचे ग्रूप एच-२ मधील भूकंड क्र.५० सदर जागा ही सोलापूर महानगरपालिकेच्या नावे असून त्यावर मृताच नावे असून त्याचे हक्काची जागा आहे. त्याचे चतु:सीमा खालीप्रमाणे: उत्तर बाजूने ३० मीरुंदीचे पाथवे, पूर्व बाजूने ७.५० मी रुंदीचे रस्ता, दक्षिण बाजूने अल्प उत्पन्न गट भूखड क्र ३६, पश्चिम बाजूने अल्प उत्पन्न गट भूखड क्र ४९.

त्या अर्थी या जाहीर नोटीसाने कळविण्यात येते कि कोणाचाही कसल्यही प्रकारची वारसबाबत हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासुन ३० दिवसाचे आत किंवा वरील अर्जची नेमलेली तारीक १७/९/२०२५ रोजी मे. न्यायालयात स्वतः अगर वाकीलामार्फात हजर व्हावे व लेखी म्हणणे दयावे सदर मुदतीत स्वतः किंवा वाकीलामार्फात हजर न झाल्यास सदर वारस दाखल्यास कोणाचाही काही हरकत नाही असे गृहित धरून मे. न्यायाधीश सो. योग्य तो आदेश पारीत करतील याची नोंद घ्यावी.

लिपिक (शिक्का) हुकुमावरून, सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर.सोलापूर

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ६३६/२०२५ नि.६

**सोलापूर येथील मे.सिव्हील जज्ञ सिनिअर डिव्हीजन श्री.एस.पी.शिलवंत सो यांचे कोर्टात**

१) कमलाबाई कृष्णाहरी पुट्टा
वय ६३ वर्षे, धंदा : काही नाही,
२) देविदास कृष्णाहरी पुट्टा
वय ४८ वर्षे, धंदा : खाजगी नोकरी,
दोघे रा.दत्तमंदिर डी – २/९६२,लक्ष्मी चौक, हैद्राबाद रोड, सोलापूर. }अर्जदार

।। विरूध्द ।।
कोणी नाही }सामनेवाला

सोलापूर शहर व जिल्हयातील तमाम जनतेस या जाहिर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविणत येते की, ज्याअर्थी यातील अर्जदार नं. १ यांची मुलगी व अर्जदार नं. २ यांची सख्खी बहिण अंबिका कृष्णाहरी पुट्टा (लग्नापूर्वीचे नांव), अंबिका व्यंकटेश सग्गम (लग्नानंतरचे नांव) ही श्री हिंगलाजमाता बिडी उत्पादक औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित, सोलापूर येथे घरखेप विडी कामगार म्हणून हयातीत काम करीत होते. सदरचा अर्ज अर्जदार नं. १ व २ यांनी मयत अंबिका व्यंकटेश सग्गम यांचे वारसदार म्हणून वर नमूद कारणासाठी वारस प्रमाणपत्र मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.यातील मयत अंबिका कृष्णाहरी पुट्टा (लग्नापूर्वीचे नांव), अंबिका व्यंकटेश सग्गम (लग्नानंतरचे नांव) यांचे नांवे भविष्य निर्वाह निधी कार्यालय सोलापूर येथील प्राव्हीडंट फंड खाते क.एम.एच./१०५७४७/२१९६२वत्याचा यु.ए.एन.नं.१०००७९५३६७०१ येथे फंडाची एकूण रक्कम रू.१६,१३६/– तसेच पेन्शन, विमा, ग्रॅच्युईटी, मजुरी, बोनस वगैरे रक्कमा जमा आहेत. यातील मयत अंबिका कृष्णाहरी पुट्टा (लग्नापूर्वीचे नांव), अंबिका व्यंकटेश सग्गम (लग्नानंतरचे नांव) यांचे मृत्युपश्चात भविष्य निर्वाह निधी कार्यालय, सोलापूर येथे वर नमुद जमा रक्कम अर्जदार यांना वारसदार या नात्याने मिळणे गरजेचे व न्यायाचे आहे, त्याकरीता अर्जदार यांनी मे. कोर्टात सक्सेशन 'सर्टीफिकेट मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याआर्थी यातील अर्जदार नं. १ व २ हे मयताचे जवळचे वारस नाहीत अथवा अन्य कोणी आहेत असे जर कोणाचे म्हणणे असेल तर अशा हरकतदारांनी सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमलेली तारीख दि२२/०९/२०२५ रोजी मे.कोर्टात हजर राहून आपल्या हरकती नोंदवून वर नमुद वेळेत कोणाची हरकत आली नाही तर सदरचे मे.कोर्ट अर्जदार नं.१ व २ यांचे नावे सक्सेशन सर्टीफीकेट देण्याचा हुकूम करेल. त्यानंतर कोणाची हरकत चालणार नाही, याची नोंद घ्यावी. जाहीर प्रसिध्दीकरण दिले ता.३०/०७/२०२५.

व.लिपिक (शिक्का) हुकुमावरून, सहा.अधिक्षक
सिव्हील जज्ज, सिनिअर डिव्हीजन सोलापूर

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ६२९/२०२५ नि.६

**सोलापूर येथील मे.सिव्हील जज्ञ सिनिअर डिव्हीजन सो,याचे कोर्टात**

१) सना अब्दुल गफ्फार शेख
वय ३३ वर्षे, धंदा : खाजगी नोकरी,
२) समरीन अब्दुल गफ्फार शेख
वय : ३८ वर्षे, धंदा : खाजगी नोकरी,
रा.एन २०२,हंजार नगर,पम्प हाऊस,हंजार नगर रोड, जिजामाता चौकाजवळ, अंधेरी (पूर्व) मुंबई.
सध्या रा.पी–१४७, ब्रह्मदेव नगर, मजरेवाडी, सोलापूर. }अर्जदार

**विरूध्द**
कोणी नाही }सामनेवाला

ज्याअर्थी खालील नमुद मिळकत यातील अर्जदार नं.१ व २ यांची जनक माता शहनाजबेगम गफार शेख यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची होती. तसेच महानगरपालिकेच्या कर आकारणी पावतीला मयत शहनाजबेगम गफार शेख यांच्या नावाची नोंद आहे. मयत शहनाजबेगम गफार शेख हे दि.२७/१०/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. त्यांच्या मयत दाखल्यावर नावाचा उल्लेख शहनाज अब्दुल गफ्फार शेख असा असून, शहनाजबेगम गफार शेख व शहनाज अब्दुल गफ्फार शेख या दोन्ही नावाची व्यक्ति एकच आहे. तसेच अर्जदार नं. १ व २ यांचे जनक पिता अब्दुल गफ्फार बाबुलाल शेख हे दि.२९/०४/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. त्याचे मृत्युपश्चात अर्जदार नं.१ व २ हेच मयताचे जवळचे नातेवाईक व कायदेशीर वारस आहेत. मिळकतीचे वर्णन:-डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर महानगरपालिका सोलापूर शहर हद्दवाढमधील ता. उत्तर सोलापूर पैकी मजरेवाडी हद्दीतील सर्व्हे नं.२८१/२ब, यापैकी ब्रह्मदेव नगर मधील प्लॉट नं.१४७ याचे एकूण क्षेत्रफळ १०५० चौ.फुट. अथवा ९७.५८ चौ.मी. इतके जागा असून यामध्ये ८१० च्या २ खोल्या, किचन, त्यातील संडास बाथरूम बांधकाम केलेली आहे, तसेच लाईट नळ कनेक्शनसह आहे, यांसी महानगरपालिका मिळकत क्र.६०१७३९ असी आहे, यांसी चतु:सिमा:-पुर्वेस: रस्ता, पश्चिमेस : ओपन स्पेस, दक्षिणेस: प्लॉट नं.१४६,उत्तरेस:प्लॉट नं. १४८.

त्याआर्थी यातील अर्जदार नं.१ व २ हे मयताचे जवळचे वारस नाहीत अथवा अन्य कोणी आहेत असे जर कोणाचे म्हणणे असेल तर अशा हरकतदारांनी सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमलेली तारीख १७/०९/२०२५ रोजी मे.कोर्टात हजर राहून आपल्या हरकती नोंदऊन वर नमुद वेळेत कोणाची हरकत आली नाही तर सदरचे मे. कोर्ट अर्जदारांचे नावे हेअरशिप सर्टीफीकेट देण्याचा हुकूम करेल. त्यानंतर कोणाची हरकत चालणार नाही, याची नोंद घ्यावी. हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले ता.३०/०७/२०२५

क.लिपिक (शिक्का) हुकुमावरून, सहा.अधिक्षक
सिव्हील जज्ज, सिनिअर डिव्हीजन सोलापूर

## चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन.क्रमांक:– SLP/13531/18/24
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक १३८०/२०२४

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर**

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक श्री यल्लमा देवी ट्रस्ट सोलापूर बाबत । न्यासाचा पत्ता :– प्लाट नं. ३४/३/५७ पी, न्यू पाच्छा पेठ्र, सोलापूर, सोलापूर, सोलापूर, सोलापूर } अर्जदार
अर्जदार सदानंद लच्छमय्या कुरापाटी,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:–
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय? (२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
जंगम मिळकत (वर्णन)

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | Corpus Fund | १००१.०० |

(अ) जंगम मिळकत : रोख रु. १००१/– मात्र (अक्षरी रुपये एक हजार एक मात्र फक्त)
स्थावर मिळकत(वर्णन):–

| शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| NO | NO | NO | NO | NO | 0.00 |

(ब) स्थावर मिळकत : रोख रु. ०/– मात्र ( अक्षरी रुपये मात्र फक्त)
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. ल्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक ३०–०७–२०२५ रोजी दिली.

(कोर्टाचा शिक्का) अधिक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,सोलापूर

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: १६०/२०२५ नि.७

**सोलापूर येथील मे.जिल्हा न्यायाधिश सो.,यांचे कोर्टात**

१) सावित्री सिध्दय्या स्वामी
वय : १६ वर्षे, धंदा : शिक्षण
२) अन्नपुर्णा सिध्दय्या स्वामी,
वय : ४१ वर्षे, धंदा : घरकाम,
अर्जदार नं. २ स्वतः करीता व अर्जदार नं. १ यांचे अ.पा.क. जनक माता म्हणून.
३) अंजनी सिध्दय्या स्वामी
वय : २० वर्षे, धंदा : शिक्षण,
सर्व रा. गरोळगी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर.
हल्ली मु. बी–११३/३, सुपर इंदिरा नगर, पाण्याच्या टाकीजवळ, बिबवेवाडी, पुणे–३७ }अर्जदार

विरुध्द
महाराष्ट्र शासन }सामनेवाला

ज्याअर्थी वरील अर्जदाराने या न्यायालयात दि.कि. अर्ज नं.१६०/२०२५ ही परिशिष्टात नमूद अज्ञानाची मिळकत ही २८ वर्षे ११ महिने करिता जे. एस. डब्ल्यू रिन्युएबल एनर्जी लि. या कंपनीला भाडयाने देण्यासाठी वरील अर्जदार यांनी हिंदू मायनॉरिटी ॲण्ड गार्डीयनशिप ॲक्ट १९५६ चे कलम ८ प्रमाणे अन्वये अर्ज यातील अज्ञान अर्जदार नं. १) सावित्री सिध्दय्या स्वामी याच्या नांवे खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही वर नमुद केलेल्या कालावधीसाठी भाडयाने देण्यासाठी परवानगीचा अर्ज मे.कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत कोणाची काही हरकत असल्यास अथवा उक्त अर्जाच्या पृष्ठर्थ अथवा विरुध्द कोणाचे काही म्हणणे असल्यास अथवा या जमीनीत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क व हिस्सा असल्याबाबत त्यांनी हा जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दिनांक २८/८/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अज्ञान अर्जदार क्र.१ याच्या मालकीची खालील नमूद जागा ही २८ वर्षे ११ महिने भाडयाने देणेकामी आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल.

मिळकतीचे वर्णन :–
अ) जिल्हा सोलापूर, तालुका अक्कलकोट येथील मौजे गरोळगी, येथील शेतजमीन गट नं. २६०/२, यांसी क्षेत्र ०हे. ८०आर + पो.ख.०.हे ०० आर यांसी एकूण क्षेत्र ०व्हे ८०आर यासी आकार १रु.२०पैसे. यासी चतु:सिमा– पूर्वेस– गरोळगी–उडगी रस्ता दक्षिणेस–गट नं. २६०/३/अ पश्चिमेस–गट नं. २६१ उत्तरेस–गट नं. २६०/१ येणेप्रमाणे चतु:सिमेतील नमूद शेतजमीन यातील दगड, माती, तदंगभूत वस्तुसह. हे जाहीर प्रसिध्दीकरण केले ता३०/०७/२०२५

(शिक्का) हुकुमावरून, अधिक्षक
जिल्हा न्यायालय – सोलापूर

## सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

पत्ता–इंद्रभुवन, पुण्यश्लोक आबासाहेब वारद पथ, रेल्वेलाईन्स, सोलापूर ४१३००१
**नगर अभियंता कार्यालय, बांधकाम विभाग, सो.म.पा.**
**मो.नं. ७७४४००९९७९**

जा.क्र.नगर अभियंता/बांधकाम विभाग/२०२५–२६/ दि.२९/०७/२०२५

### जाहीर टेंडर नोटीस

या विभागाकडुन महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना (जिल्हास्तर) सन २०२४–२५ बांधकामे करणेकरिता १ कामाचे निविदा प्रसिध्द करण्यात आले आहे. 1) 2025_SMC_1204532_1

सदर कामाचा तपशील www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि.२८/०७/२०२५ पासुन पाहण्यास उपलब्ध आहे.

सही/–
उपअभियंता (बांधकाम)
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: २८६/२०२५ नि.५

**सोलापूर येथील मे.दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर मा.नवले सो यांचे कोर्टात**

१. श्रीमती शांता अशोक इंजामुरी
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
२. श्री. गणेश अशोक इंजामुरी
वय : ३० वर्षे, धंदा : नोकरी
दोघेही रा. अंबाबाई मंदिर जवळ, ५६, नवले नगर, एम.आय.डी.सी., सोलापूर }अर्जदार

**विरुध्द**
कोणीही नाही }सामनेवाला

ज्याअर्थी यातील सदर अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. यांचे पिता स्व. अशोक विठोबा इंजामुरी हे सोलापूर येथे दि. २८/०८/२०२३ रोजी मयत झालेले असून सदर खालील मिळकत ही स्व. अशोक विठोबा इंजामुरी यांची आहे.मिळकतीचे वर्णन :– डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील कसबे सोलापूर येथील जुना सर्व्हे नं. १८९/३ब पैकी नविन सर्व्हे नं. १८० / ३ब यापैकी नियोजित नवले नगर या नावाने ओळखले जाणारे यामधील प्लॉट नं. ५६ या प्लॉटचे क्षेत्र पुर्व–पश्चिम ३० फुट व दक्षिण उत्तर २४ फुट असे एकुण ७२० चौ. फुटाची जागा असुन असुन यांसी चतु:सिमा

खालीलप्रमाणे :– पूर्वेस : प्लॉट नं. १७, पश्चिमेस:रस्ता, दक्षिणेस:रस्ता, उत्तरेस: प्लॉट नं. ५५ येणेप्रमाणे चतु:सिमेमध्ये वर्णन केलेली मिळकत त्यातील दगड, माती वगैरे तदंगभुत वस्तुसह व इजमेंट हक्कासहची मिळकत.सदर वर नमूद मिळकतीचे स्व. अशोक विठोबा इंजामुरी यांचे वारसदार असल्याचे अर्जदार नं. १ व २ यांना लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेसाठी या कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर मिळकतीचे स्व. अशोक विठोबा इंजामुरी यांचे वारसदार असल्याचे लिगल हेअरशिप सर्टिफिकेट सदर अर्जदार नं. १ व २ यांना देणेबाबत कोणाचेही काही हरकत व तकार असल्यास सदर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसात किंवा नेमलेली तारीख २८/८ /२०२५ रोजी मे. कोर्टात हजर राहून लेखी हरकत घ्यावी, अन्यथा पुढील आदेश पारीत करुन अर्जदार यांचे नावे वारसा दाखल दिला जाईल याची नोंद घ्यावी. ही जाहीर प्रसिध्दीकरण दिली ता.२९/७/२०२५ हुकुमावरून,

लिपिक (शिक्का) सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर.सोलापूर

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्रि/अभि./कावि/क्र: ०४/२०२५

**मोहोळ येथील मा.तहसिलदार सो, यांचे कोर्टात**

श्री. नेताजी सुरेश व्हळगुंडे,
वय–३३ वर्षे, धंदा–शेती,
रा. औंढी, ता. मोहोळ,
जि. सोलापूर. }अर्जदार

**विरुध्द**
ग्रामपंचायत औंढी,
ता. मोहोळ, जि.सोलापूर
(अर्जाची नोटीस ग्रामसेवक औंढी, ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी. }सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांचा मुलगा निल नेताजी व्हळगुंडे याचा जन्म ता.१५/०६/२०१७ रोजी त्यांचे घरी मौजे औंढी, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा त्यांच्या मुलाचा जन्म दाखल्याची ता.२९/११/२०२२ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जुन २०१७ चे अभिलेखात अर्जदार यांचा मुलगा निल नेताजी व्हळगुंडे याचा जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला.

त्याअर्थी सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात अर्जदार यांच्या मुलाची जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. दि.०१/०९/२०२५ रोजी किंवा ही याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास नोटीस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे.ता.३०/०७/२०२५

लिपिक (शिक्का) हुकुमावरून, सहा.अधिक्षक
मा. तहसिलदार सो, मोहोळ

## पब्लीक नोटीस

मौजे मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील खुला बिगर शेती प्लॉट नं. ९०२/१/ब/१९ पैकी प्लॉट क्र. १९ ज्याचे क्षेत्र १०१.२५ चौ.मी. आहे. आम्ही सदरची बिगरशेती मिळकत श्री. प्रभाकर राजाराम क्षिरसागर, रा. रेल्वे लाईन सोलापूर यांच्याकडुन दि. १८/२/२०२२ रोजी खरेदी केली असुन सदरचे खरेदीखत दस्त नं. ९०६/२०२२ अन्वये सब रजिस्ट्रार मोहोळ यांचेकडे नोंदवलेले आहे. सदर मिळकतीच्या खरेदीखताप्रमाणे ७/१२ उताऱ्यावर आमच्या नांवाची नोंद मालक सदरी झालेली आहे. परंतु दरम्यानच्या काळात आमच्याकडुन मुळ खरेदी दस्त क्रमांक ९०६/२०२२ गहाळ झाले असुन ते कोणाला सापडले असेल तर त्यांनी आम्हाला खालील दिलेल्या पत्त्यावरती किंवा मोबाईल नंबरवरती संपर्क करावा. सदर खरेदीखतावरती कुठल्याही स्वरुपाचा बोजा किंवा आम्ही ते खरेदीखत कोठेही तारण म्हणुन ठेवलेले नाही. सदरचा खरेदी दस्त गहाळ झालेबाबत आम्ही मोहोळ पोलीस स्टेशन येथे दि. २८/७/२०२५ रोजी गहाळ रजिस्टर नं. २९६/२०२५ अन्वये नोंद केलेली आहे.

सही/– श्री. दादासाहेब संभाजी गवळी, रा.पेनूर,ता.मोहोळ,जि.सोलापूर. मो.नं. ९६०४७६००७७
सही/– श्री. नवनाथ संभाजी गवळी, रा.पेनूर,ता.मोहोळ,जि.सोलापूर. मोल, ८१८०८९२९६९